MHNG170005702021

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, भिवापूर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी एस.जे. लाड)

## न्या य नि र्ण य

(दिनांक  १० मार्च, २०२६ रोजी पारीत केला.)

आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) नुसार दंडनिय अपराध केल्याच्या आरोपावरुन संपरीक्षा चालविण्यात आली.

**२.** अभियोग पक्षाचे कथन व बचाव यावरुन माझे खालील बाबी विचारार्थ आल्या. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि. १८.०९.२०२१ रोजी १८.३० वा. दरम्यान मौजा नांद, भिवापूर, ता.भिवापूर येथे आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या १८ निपा प्रत्येकी १८० मि.ली.च्या विना पास किंवा परवाना, अवैधरित्या बाळगताना मिळून आलात ? | **... नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **... अंतिम आदेशाप्रमाणे** |

**३.** आरोपीवरील आरोप सिध्द करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षाने पंच साक्षीदार राहुल बापुराव डांगे (सा.क्र.१) व निखील पुरुषोत्तम गजभिये (सा.क्र.२) यांना निशाणी ११ खाली तपासले. इतर साक्षीदारांना वारंवार समन्स व वॉरंट काढून देखील ते प्रस्तुत प्रकरणात हजर झाले नाही. त्यामुळे निशाणी १ वर सविस्तर आदेश करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. साक्षीदाराच्या पुराव्यात आरोपीविरुध्द सबळ

पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ :–**

४. अभियोग पक्षाने त्यांचे कथने संदर्भात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता दोन साक्षीदार तपासले. पंच साक्षीदार राहुल बापुराव डांगे (सा.क्र.१) व निखील पुरुषोत्तम गजभिये (सा.क्र.२) यांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. त्यानंतर अभियोग पक्षाने त्यांचा सविस्तर उलट तपास घेतला, परंतु, त्यामध्ये अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काही आले नाही. अभियोग पक्षाने स्वतंत्र्य साक्षीदाराचे मार्फत जप्तीची कारवाई सिध्द झाल्याची बाब अभिलेखावर आणणे गरजेचे होते, परंतु सदरहू प्रकरणात पंच साक्षीदार राहुल बापुराव डांगे (सा.क्र.१) व निखील पुरुषोत्तम गजभिये (सा.क्र.२) यांनी अभियोग पक्षाच्या कथनेस सहकार्य न केल्याने सदरहू गुन्ह्यात जप्तीची कारवाई सिध्द झाल्याचे दिसून येत नाही. तसेच या खटल्यात अभियोग पक्षाला योग्य संधी देवूनही त्यांनी ईतर साक्षीदार तपासले नाहीत. म्हणून निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा खटला बंद करण्यात आला.

५. सदरहू गुन्ह्यात रासायनिक अहवाल अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे जप्त केलेल्या बॉटलमध्ये देशी दारु आहे हे सिध्द होत नाही. तसेच, त्याला सहायक करणारा जप्ती पंचनामा सिध्द होवू शकला नाही. वरील नमुद चर्चेवरुन अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा सिध्द केलेला नाही. त्यामुळे सदर गुन्ह्यात दाखल केलेल्या निपा आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली आहे याबाबत संशय निर्माण होतो. एकंदरीत अभिलेखावरुन उपलब्ध साक्षी पुराव्यावरुन आरोपीने गुन्हा केल्याची बाब सिध्द होत नाही. याकरिता मी मुद्दा क्रमांक १ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक २ :–**

**६.** वरील सर्व विवेचनावरुन विचारार्थ बाब क्र.१ सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. करिता मी विचारार्थ बाब क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे. परिणामतः मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **उमेश दादाजी पाटील** याला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिंया संहिताचे कलम ४३७ (अ) अंतर्गत रुपये १५०००/– (पंधरा हजार रुपये) चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

४. खटल्यातील जप्त १८ निपा देशी दारु प्रत्येकी १८० मि.ली.च्या या अपील कालावधीनंतर योग्य त्या कायदेशीर विल्हेवाटीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग उमरेड यांचेकडे पाठविण्यात याव्यात.

(न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.03.10 12:09:41 +0530

भिवापूर. (एस. जे. लाड)
दिनांक :– १०.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : Ku. K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.